SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE
Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART-TWO

गुरुवार, दिनांक २४ ऑक्टोबर, २०१३

अधिसूचना

क्रमांक : १२१/२०१३ दिनांक : २४/१०/२०१३

विषय : परीक्षा आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखांबाबत...
उन्हाळी - २०१४ परीक्षा (नियमित महाविद्यालयीन विद्यार्थी)

सर्व संबंधीतांचे माहीतीकरीता सूचित करण्यात येते की, उन्हाळी २०१४ परीक्षेकरीता प्रवेशित होऊ इच्छिणाऱ्या व परीक्षेस पात्र असणाऱ्या वार्षिक पद्धती (Annual Pattern) व सत्र पद्धती (Semester Pattern) अभ्यासक्रमाच्या नियमित महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरीता परीक्षा आवेदनपत्रे स्विकारण्याच्या / सादर करावयाच्या तारखा खालीलप्रमाणे राहतील.

| अ. क्र. | परीक्षेचे नांव / विद्याशाखेचे नांव | आवश्यक त्या शुल्कासह | | आवश्यक शुल्क + विहीत केलेल्या विलंब शुल्कासह | |
|---|---|---|---|---|---|
| | | महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून परीक्षा आवेदनपत्रे स्विकारावयाची तारीख | महाविद्यालयाने विद्यापीठात सादर करावयाची तारीख | महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून परीक्षा आवेदनपत्रे स्विकारावयाची तारीख | महाविद्यालयाने विद्यापीठात सादर करावयाची तारीख |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| अ. | वार्षिक पद्धती (Annual Pattern) अभ्यासक्रम : कला, वाणिज्य, विज्ञान, गृहविज्ञान, विधी, समाजविज्ञान, वैद्यक, अभियांत्रिकी व तांत्रिकी, शिक्षण (शारिरीक शिक्षणसह) विद्याशाखेतील सर्व प्रमाणपत्र, पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सर्व वार्षिक पद्धती (Annual Pattern) परीक्षा, तत्वज्ञान पारंगत परीक्षा, ग्रंथालयशास्त्र प्रमाणपत्र परीक्षा | १६/१२/२०१३ | २६/१२/२०१३ | ०१/०१/२०१४ | ११/०१/२०१४ |
| ब. | सत्र पद्धती(Semester Pattern)अभ्यासक्रम: वाणिज्य, विज्ञान, गृहविज्ञान, समाजविज्ञान, वैद्यक, विधी, शिक्षण (शारिरीक शिक्षणसह), अभियांत्रिकी व तांत्रिकी विद्याशाखेतील सर्व प्रमाणपत्र, पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सर्व सत्र पद्धती/ अर्धवार्षिक (Semester Pattern/ Bi-Annual Pattern) परीक्षा. | १०/०१/२०१४ | २०/०१/२०१४ | २५/०१/२०१४ | ०४/०२/२०१४ |
| माजी व बहिःशाल विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखांबाबत : माजी / बहिःशाल विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखांची अधिसूचना क्रमांक ८७/२०१२, दिनांक २८/०६/२०१२ अन्वये यापूर्वीच प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. त्यानुसार परीक्षा आवेदनपत्रे स्विकारण्याची / सादर करावयाची कार्यवाही प्राचार्यांनी / विभागप्रमुखांनी / विद्यार्थ्यांनी करावी. | | | | | |

महत्वाची सूचना :

१. उपरोक्त परीक्षा आवेदनपत्रे स्विकारावयाच्या / सादर करावयाच्या अंतिम तारखेस महाविद्यालय / विद्यापीठ कार्यालयास सुटी असल्यास सदर तारखेनंतर येणारी कार्यालयीन कामकाजाची तारीख ग्राह्य धरण्यात यावी.

२. शैक्षणिक सत्र २०१३-१४ मधील सत्र पद्धती (Semester Pattern) अभ्यासक्रमातील द्वितीय सत्रातील नियमित विद्यार्थ्यांचे प्रवेश उपरोक्त नमूद तारखांनंतर होतील अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे त्याचे प्रवेशाचे तारखेपासून दहा दिवसांचे आत विद्यापीठात सादर करावीत.

३. अध्यादेश क्रमांक २१/२००१ नुसार सर्व संलग्नित महाविद्यालयांनी माजी व बहिःशाल विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे स्विकारणे अनिवार्य आहे.

मा.कुलगुरुंचे आदेशान्वये.

स्वा/-
(जे.डी.वडते)
परीक्षा नियंत्रक,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

*****

अधिसूचना

क्रमांक : १२२/२०१३ दिनांक : २४/१०/२०१३

विषय : उन्हाळी २०१४ लेखी परीक्षेच्या तारखांची घोषणा.

सर्व संबंधीतांचे माहीतीकरीता सूचित करण्यात येते की, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी २०१४ च्या लेखी परीक्षा खाली दर्शविल्याप्रमाणे घेण्यांत येतील.

अ. गुरूवार, दिनांक २० मार्च, २०१४ पासून व पुढे सुरु होणाऱ्या परीक्षा.

(Annual Pattern पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम व तृतीय वर्षाच्या परीक्षा)

कला, समाजविज्ञान, विज्ञान, वाणिज्य, गृहविज्ञान आणि शिक्षण (शारिरीक शिक्षण) विद्याशाखेतील स्नातक अभ्यासक्रमाच्या (त्रिवर्षीय अभ्यासक्रम) प्रथम व अंतिम वर्षाच्या सर्व परीक्षा, बी.एफ.ए.भाग-१ व ३ (Animation) परीक्षा.

प्रादर्शिक कला स्नातक भाग १व ३ परीक्षा, बी.बी.ए. भाग १ व ३ परीक्षा, बी.सी.ए.भाग-३ परीक्षा. ग्रंथालय व वृत्तविज्ञान स्नातक.

ब . गुरूवार, दिनांक १० एप्रिल, २०१४ पासून व पुढे सुरु होणाऱ्या परीक्षा.

(Annual Pattern पदवी अभ्यासक्रम द्वितीय वर्ष, पदव्युत्तर व पदविका अभ्यासक्रमाच्या परीक्षा)

कला, समाजविज्ञान, विज्ञान, वाणिज्य, गृहविज्ञान आणि शिक्षण (शारिरीक शिक्षण) विद्याशाखेतील स्नातक अभ्यासक्रमाच्या (त्रिवर्षीय अभ्यासक्रम) द्वितीय वर्षाच्या सर्व परीक्षा व शिक्षण स्नातक (बी.एड.) परीक्षा, बी.एफ.ए.भाग-२ (Animation) परीक्षा.

कला, समाजविज्ञान, गृहविज्ञान आणि शिक्षण विद्याशाखेतील (शारिरीक शिक्षण) पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या (वार्षिक पद्धती अभ्यासक्रम) सर्व परीक्षा., ग्रंथालय व माहिती विज्ञान पारंगत परीक्षा, प्रादर्शिक कला स्नातक भाग २, बी.बी.ए.भाग २ परीक्षा, बी.सी.ए. भाग २ परीक्षा., विपणन प्रबंध पदविका, आर्थिक प्रबंध पदविका, करनिर्धारण पदविका आणि व्यवसाय प्रबंध पदविका परीक्षा, बी.एम.सी., BJMC परीक्षा, Dip. In Functional English परीक्षा., शिक्षण विद्याशाखेतील शारिरीक शिक्षण स्नातक (एक वर्षीय अभ्यासक्रम) व योग शिक्षण पदविका परीक्षा, Dip. In Yoga Theraphy परीक्षा.,

वैद्यक विद्याशाखेतील (भेषजीसह) सर्व वार्षीक पद्धती परीक्षा (आयुशल्य स्नातक, भेषजी स्नातक, भेषजी पारंगत परीक्षा), आयुर्वेद विद्याशाखेतील परीक्षा, शिक्षण विद्याशाखेतील शिक्षण पारंगत परीक्षा. (Semester Pattern पदवी अभ्यासक्रमाच्या सर्व Odd Semester च्या खालील परीक्षा)

B.Sc.Sem.I, III, V, B.C.A.Sem. I, III, V, LL.B.(5 Yr.), Sem.I, III, V, VII, IX, LL.B.(3 Yr.), Sem.I, III, V, B.F.D. Sem.I, III, V, B.Pharm.Sem.I, III, V, VII ग्रंथालयशास्त्र प्रमाणपत्र परीक्षा.

क. शुक्रवार, दिनांक २५ एप्रिल, २०१४ पासून व पुढे सुरु होणाऱ्या परीक्षा.

अभियांत्रिकी व तांत्रिकी विद्याशाखेतील स्नातक अभ्यासक्रमाच्या सर्व (वार्षिक व सेमिस्टर पद्धती) परीक्षा.

(Semester Pattern पदव्युत्तर व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाच्या सर्व Odd Semester च्या परीक्षा व Semester Pattern पदवी अभ्यासक्रमाच्या सर्व Even Semester च्या परीक्षा)

P.G.Dip. in Sound Recording Sem- I & III, M.J.M.C.Sem-I, M.Com. Sem.I & III, M.C.,M. Sem-I & III, M.I.R.P.M. Sem-I & III, M.B.A.Sem-I & III, PGDCCA, P.G.Dip.Computer Management Sem-I,

B.Sc.(Home Sci.) Sem-II,IV,VI, B.Sc.Sem.II,IV,VI, B.C.A.Sem.II, IV, VI, B.F.D.Sem.II,IV,VI, LL.B.(5 Yr.), Sem.II, IV, VI, VIII,X, LL.B.(3 Yr.), Sem.II, IV,VI, B.Pharm.Sem.II, IV,VI,VIII, Pharm.D.Part-I, II & III परीक्षा.

M.Tech.(Cosmetics) Sem-I.

M.Sc.Sem-I & III, P.G.Diploma in Web.Tech & Advanced Multimedia Sem- I & III, P.G.Dip. in Bio-diversity Sem- I & III, P.G.Dip, in Watershed Tech. & Management Sem-I, P.G. Diploma in Non-Conventional Energy System Sem-I, P.G.Diploma in Bio-Medical Electronics Sem-I, P.G.Dip. in Ground Water Exploration & Watershed Mgt. Sem- I & III. Diploma in Bio-Informatics, Dip. in Soil & Water Analysis,

M.P.Ed.Sem.-I, & III, M.Pharm.Sem.-I, LL.M. Sem-I, III., P.G.Diploma in Human Rights Education, P.G.Diploma in Cyber Law, Taxation Law, Diploma in Labour Law, P.G.Diploma in Law, Medical Jurisprudence.

अभियांत्रिकी व तांत्रिकी विद्याशाखेतील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या (M.E./M.Tech.) Odd Semester च्या सर्व परीक्षा, M.Sc.(A/E) Sem-I, III, F.Y.M.C.A. Sem-I, S.Y.M.C.A.Sem-I, T.Y.M.C.A.Sem.I, P.G.Dip. in Comp.Sci.Sem-I.

ड. सोमवार , दिनांक ०५ मे, २०१४ पासून व पुढे सुरु होणाऱ्या परीक्षा.

(Semester Pattern पदव्युत्तर व पदविका अभ्यासक्रमाच्या सर्व Even Semester च्या परीक्षा)

P.G.Dip. in Sound Recording Sem- II, M.M.C.Sem-II/ M.J.M.C.Sem-II

M.Com.Sem.II ,IV,M.C.,M. Sem-II & IV, M.I.R.P.M. Sem-II & IV, M.B.A.Sem-II & IV, P.G.Dip. in Comp.Mgt.Sem-II.

M.Sc.(Home Science) Sem.-II, M.Tech.(Cosmetics) Sem-II.

M.Sc.Sem-II & IV, P.G.Diploma in Web.Tech & Advanced Multimedia Sem- II & IV, P.G.Dip. in Bio-diversity Sem- II, P.G.Dip, in Watershed Tech. & Management Sem-II, P.G. Diploma in Non-Conventional Energy System Sem-II, P.G.Diploma in Bio-Medical Electronics Sem-II, P.G.Dip. in Ground Water Exploration & Watershed Mgt. Sem- II & IV., M.P.Ed.Sem.-II, IV, LL.M. Sem-II, M.Pharm.Sem.II.

अभियांत्रिकी व तांत्रिकी विद्याशाखेतील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या (M.E./M.Tech.) Even Semester च्या सर्व परीक्षा, M.Sc.(A/E) Sem-II, IV, F.Y.M.C.A. Sem-II, S.Y.M.C.A. Sem-II, P.G. Dip. in Comp. Sci. Sem-II., तत्वज्ञान पारंगत परीक्षा.

(टीप : वरील परीक्षा सुरु होण्याचे तारखेचे दिवशी सार्वजनिक सुटी असल्यास परीक्षा त्यानंतरच्या दिवसापासून सुरु होईल.)

**परीक्षा मंडळाच्या वतीने-**

स्वा/-
(जे.डी.वडते)
परीक्षा नियंत्रक

*****

SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE
Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART-TWO

(Extra-Ordinary)
Monday, the 28th October, 2013
Notification

No. : 123/2013 Date : 28/10/2013

Subject :- Cessation of membership of the members on the Various Boards of Studies
Ref'nce :- Notification No. 166/2012, Dt. 30.11.2012

It is notified for general information of all concerned that the membership of the members mentioned in column No. 2 of the following table, each member co-opted under provision of 37(3)(a) of the Maharashtra Universities Act, 1994 on the Board of Studies mentioned in column No. 3 has been ceased in accordance with the provision made under sub section (1) of section 48 of the above mentioned Act with effect from the date mentioned in column No. 4, due to their resignation from the respective Board of Studies.

**Table**

| **Sr. No.** | **Name/Address of the member** | **Name of the Board of Studies** | **Date of effect of cessation** |
|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. |
| 1. | Dr. Ziaul Hasan Khan<br>Shri Shivaji Arts, Commerce & Science College, Akola. | Bio-Chemistry (including Microbiology & Food Science) | 8.10.2013 |
| 2. | Dr.Babar Ali Khan<br>Degree College of Physical Education, Amravati. | Physical Education & Recreation | 8.10.2013 |
| 3. | Dr.S.V.Thakare<br>Deptt. of Mathematics,<br>Dr.Babasaheb Naik Engineering College, Pusad,<br>Dist. Yavatmal. | Humanities & Applied Sciences, General Engg. | 8.10.2013 |
| 4. | Dr. Mrs. Aparna C. Deshpande<br>K.N.Arts & Commerce College, Karanja (Lad),<br>Dist. Washim. | Home Economics | 10.10.2013 |
| 5. | Dr.S.Y.Tarale<br>Dr. Gopalrao Khedkar Mv.,<br>Gadegaon, Telhara. | Commerce | 24.10.2013 |

By virtue of his/her membership on the Board of Studies, the membership acquired by him/her on other Authorities/Bodies of the University shall also stand ceased.

Sd/-
(J.D.Wadate)
I/C Registrar,
Sant Gadge Baba Amravati University

*****

SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE
Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART-TWO

गुरुवार, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१३
अधिसूचना

क्रमांक :१२४/२०१३ दि. ३१/१०/२०१३

**विषय :- कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार- २०१३**

सर्व सामान्यांच्या माहिती करीता कळविण्यात येते की, विनिमय क्र. २४/२००२ नुसार माजी आमदार द.ना. उपाध्य बबनराव मेटकर यांच्याकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून सुरू करण्यात आलेल्या **कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार- २०१३** साठी जेष्ठ समाजसेवक **श्री चुन्नीलालजी मोतीलालजी मंत्री, अमरावती** यांची पुरस्कार निवड समितीने एकमताने निवड केली आहे. **श्री चुन्नीलालजी मोतीलालजी मंत्री** यांचा जीवन माहितीपट पुढील प्रमाणे आहे.

**श्री चुन्नीलालजी मोतीलालजी मंत्री यांचा जीवन माहितीपट**

पुरस्कारासाठी यावर्षी निवड झालेले श्री चुन्नीलालजी मोतीलालजी मंत्री यांचा जन्म १ जुलै, १९२० रोजी झाला असून ते मुळचे तिवसा येथील रहिवासी आहेत. वयाच्या ९५ व्या वर्षी सुद्धा त्यांचे समाजसेवेचे व्रत निरतंरपणे आजही सुरू आहे. अमरावतीकर त्यांना प्रेमाने व आदराने बाबूजी म्हणतात. अतिशय हलाखीच्या व नाजूक परिस्थितीत त्यांनी चवथी पर्यंत आपले शिक्षण पूर्ण केले. अगदी लहान वयात पितृछत्र हरविल्यामुळे त्यांच्यावर कौटुंबिक जबाबदारी आली. १९३६ मध्ये अमरावती येथे त्यांनी कापड व्यवसायाला सुरूवात केली. आज त्यांच्या व्यवसायाचे वटवृक्षात रूपातंर झाले आहे.

श्री मंत्री आज श्रीमंत असले तरी त्यांची सामाजिक कार्याची तळमळ पूर्वी सारखीच आहे. वयाच्या ९५ व्या वर्षी सुद्धा तरूणांना लाजवेल अशी त्यांच्यामध्ये स्फूर्ती आहे. कर्मयोगी श्री संत गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर असल्यामुळे त्यांनी महापुरूषांच्या शिकवणूकीनुसार आजवर सामाजिक कार्य केले आहे. राजस्थानी मंडळ, मारवाडी बालगणेश उत्सव मंडळ, रिटेल क्लॉथ असोसिएशन, होलसेल क्लॉथ असोसिएशनच्या माध्यमातून त्यांनी आपले सामाजिक कार्य सुरू केले. ब्रजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीचे ते संस्थापक सदस्य असून अमरावती येथील श्री संत सिताराम बाबा चॅरीटेबल ट्रस्ट, अमरावती, सोसायटी फॉर प्रो- टेक्नीकल पब्लीक राईट, अमरावती, गडगडेश्वर महादेव मंदीर ट्रस्ट, अमरावती. मोतीलालजी रामरतनजी मंत्री चॅरीटेबल ट्रस्ट, अमरावतीचे ते सन्माननीय अध्यक्ष आहेत. याशिवाय राजगृह निर्माण संस्था व स्वस्तिक सहकारी गृहनिर्माण संस्थांचे संस्थापक आहेत.

कर्मयोगी श्री संत गाडगेबाबा यांच्या दशसूत्रीनुसार श्री मंत्री यांनी आयुष्यभर सामाजिक कार्य केले आहे. सण व धार्मिक कार्यामध्ये अन्नदान योजना, शहरात पाणपोईद्वारे तहानलेल्यांना पाणी त्यांनी उपलब्ध करून दिले असून त्यांना अमरावतीकर **'**पाणीवेडा मंत्री**'** किंवा **'**प्याऊवाले बाबूजी**'** संबोधतात. याशिवाय गरजूंना कपडे, शाल, ब्लॅकेट्स, गणवेश, गरीब मुला-मुलींना वह्या- पुस्तके, हद्यविकार, कॅन्सर, किडनी, क्षयरोग अशा रूग्णांना औषधोपचारासाठी मदत त्यांनी पुरविली असून आपल्या व्यवसायाच्या माध्यमातून बेरोजगारांना रोजगार त्यांनी उपलब्ध करून दिला आहे.

संत गाडगेबाबांच्या दशसूत्रीनुसार जेष्ठ समाजसेवक **मा.श्री. चुन्नीलालजी मोतीलालजी मंत्री** यांनी अनेक समाजोपयोगी कार्य केले असून त्यासाठी आपले स्वतःचे संपूर्ण जीवन समर्पीत केले आहे. त्यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा **'कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार - २०१३'** घोषीत करण्यात आला आहे.

स्वा/-
(जे.डी. वडते)
प्र.कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****

अधिसूचना

क्रमांक : १२५/२०१३ दिनांक : ३१/१०/२०१३

विषय : शैक्षणिक नियामिका ,,, शैक्षणिक वर्ष २०१३-२०१४ ला शुध्दीपत्रक
संदर्भ : अधिसूचना क्र. १७०/२०१२, दि. १७.१२.२०१२

सर्व संबंधितांच्या माहिती करीता अधिसूचित करण्यात येते की, संदर्भांकित अधिसूचना क्र. १७०/२०१२ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१३-२०१४ करीता शैक्षणिक नियामिका यापूर्वी प्रसिध्द केली आहे. सदर शैक्षणिक नियामिकेतील 'तक्ता-ड (सार्वजनिक सुट्या)' मध्ये खालील तक्त्यातील स्तंभ क्र. ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अंशतः दुरुस्ती करण्यात येत आहे याची सर्वांनी नोंद घ्यावी.

| **अ.क्र.** | **सण** | **अधिसूचना क्र. १७०/२०१२ मधील अ.क्र., दिवस व दिनांक** | **सुचविलेला सुधारीत दिवस व दिनांक** |
|---|---|---|---|
| **१.** | **२.** | **३.** | **४.** |
| १. | महाशिवरात्री | १२.शुक्रवार, दि. २८ फेब्रुवारी, २०१४ | गुरुवार, दि. २७ फेब्रुवारी, २०१४ |
| २. | होळी (दुसरा दिवस) | १३.मंगळवार,दि. १८ मार्च, २०१४ | सोमवार,दि. १७ मार्च, २०१४ |
| ३. | गुढी पाडवा | १५.शुक्रवार, दि. ११ एप्रिल, २०१४ | सोमवार, दि. ३१ मार्च, २०१४ |

अधिसूचना क्र. १७०/२०१२ मध्ये उल्लेखित इतर बाबी जशाच्या तशा लागू राहतील.

स्वा/-
(जे.डी.वडते)
प्र.कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****